# महात्मा गांधीच्या विचारांचे आधुनिक काळात औचित्य

**डॉ. रुपराव उकंडराव गायकवाड**
सहयोगी प्राध्यापक
मनोहरभाई पटेल महाविद्यालय, सालेकसा
जि.गोंदिया
९४२२८१८६४२
ruprαogaikwad94@gmail.com

आधुनिक काळात तंत्रज्ञानाने नेत्रदिपक प्रगती केली. परंतु केवळ तंत्रज्ञानानेच मानवाचे जीवन सुखी होवू शकत नाही. तर त्यासोबत मानवामध्ये मानवता निर्माण होणे आवश्यक आहे. अन्यथा जी काही प्रगती विज्ञानाच्या आधारावर केली आहे. त्याद्वारे संपुर्ण मानव जातीचा संहार झाल्याशिवाय राहणार नाही. ही गोष्ट म. गांधीनी त्या वेळेला ओळखून त्यांनी अनुभवलेली दक्षिण आफ्रिकेतील विषमता अनुभवून भारताचे पारतंत्र नष्ट करण्यासाठी ज्या साधनांचा व विचारांचा उपयोग स्वातंत्र चळवळीसाठी केला व भारताला स्वातंत्र प्राप्त करुन दिले. त्या विचार प्रणालीची भारताला आज सुद्धा तेवढीच आवश्यकता आहे. किंबहुना त्यापेक्षाही जास्त आवश्यकता आहे.

महात्मा गांधी के भारतीय स्वातंत्र चळवळीतील एक अद्वितीय नेते होते. त्यांनी प्रत्यक्ष राजकारणात भाग घेतला नाही. परंतु त्यांनी राजकारणाला दिशा दिली. म्हणून त्यांना राजकारणातील संत असे म्हटले आहे. महात्मा गांधीच्या स्वातंत्र चळवळी ने इंग्रजांवर प्रचंड प्रभाव पडलेला होता. त्यांचे विचार कृती प्रवण होते. त्यांनी स्वातंत्र चळवळीमध्ये भारतातील सर्व घटकांचा समावेश करुण स्वातंत्र चळवळ प्रभावशाली केली. त्यामुळेच भारतीय जनता इंग्रजांना विरोध करु लागली. म. गांधीनी चळवळीचे नेतृत्व करुन अहिंसेच्या मार्गाने आंदोलन केली. त्यामुळे इंग्रजांची सत्ता धोक्यात येवू लागली. गांधीनी आपले आंदोलने व चळवळी वेगवेगळया माध्यमातून सुरु ठेवल्या आणि प्रचंड भारतीय लोकमत करण्यात यशस्वी झाले. म. गांधी आपली चळवळ आणि आंदोलने नैतिक विचारांनी केली. नितीमत्तेचा कुठेही लोप होऊ दिला नाही. म्हणून त्यांचे विचार भारतीय समाजाला मार्गदर्शन करण्यासाठी उपयुक्त होते आहे आणि भविष्यातही कायम राहणार आहेत.

## म. गांधीच्या विचारांचा वारसा

म. गांधीनी भारताला अनेक विविध प्रकारचे विचार दिलेत. गांधीजीमध्ये मानवाविषयी असिम प्रेम होते, सत्य, अहिंसा सत्याग्रह, ग्रामविकास, विश्वस्त पद, रामराज्य, शिक्षण, पर्यावरण, विषमता, इत्यादी विषयांवर म. गांधीनी आपले विचारधन दिलेले आहे. त्यांची वर्तमानात उपयुक्तता खालील बाबींच्या आधारे विचारात घेऊ.

### अ) सत्य :–

म. गांधीनी आपली चळवळ आणि आंदोलने तत्वाच्या आधारे केलेली आहेत, सत्य कधीही पराजित होत नाही. सत्यासाठी म, गांधीनी आपले संपूर्ण जीवन कामी लावले. सत्य मार्गानेच भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रयत्न केलेत. असत्य कधीही महात्मा गांधीनी पटवून घेतले नाही. इंग्रजांच्या विरुद्ध कोणतेही शस्त्र न वापरता सत्य आणि अहिंसेच्या माध्यमातून क्रांती करण्यासाठी गांधीनी जीवनभर संघर्ष केला. आपण सत्याच्या मार्गाने जर जात असेल तर कितीही मोठा व्यक्ती असो अथवा शक्ती असो तिला

घाबरण्याचे काहीही कारण नाही असे गांधीजी आपल्या तत्वज्ञानात सांगतात. आज आपल्या समाजाची जी नितीमत्ता घसरलेली आहे. तिचे महत्वाचे कारण म्हणजे राजकीय नेत्यांमध्ये खोटे बोलण्याची प्रवृत्ती आहे. यातूनच भ्रष्टाचार निर्माण झालेले आहे. जर भ्रष्टाचार संपवायचा असेल तर गांधीजींनी सागितल्यां सत्यतत्वाचा अवलंब करुन भ्रष्टाचार नष्ट करु शकतो. म्हणून म. गांधीचे विचार आजही महत्वपूर्ण आहेत.

**ब) अहिंसा :**

म. गांधीजी अहिंसा तत्वाचा स्वीकार करून आपले जीवन दर्शन व्यक्त केलेले आहे. भारताच्या प्राचीन काळात सुद्धा गौतम बुद्ध, महावीर यांनी अहिंसेचे विचार प्रकट केलेत त्याचाच आदर्श घेऊन म. गांधीनी सुद्धा अहिंसा तत्वाला फार महत्व दिले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अहिंसा ही शूर वीरांचा गुण आहे. भित्र्या लोकांना अहिंसा तत्व पालन करत येत नाही. कारण अहिंसेमध्ये प्रतिस्पर्धी कितीही शक्तिशाली असला तरीही एखाद्याने एका गालावर चापट मारली तर दुसरा गाल पुढे करून त्याचा शांततेने विरोध करावयाचा आणि मारणाऱ्याच्या मनात अपराध भावना जागृत करून वाईट कर्मापासून परावृत करायचे असे तत्त्वज्ञान म. गांधीनी अहिंसेच्या माध्यमातून व्यक्त केले आहे.

भारताच्या स्वातंत्र लढयामध्ये इंग्रज बलशाली असून आाणि भारतीय प्रजेकडे कोणीतीही शक्ती नसतांना इंग्रजांच्या अन्यायकारक शासनाच्या विरुद्ध गांधीनी प्रचंड प्रमाणात अहिंसेच्या मूल्याच्या आधारावर जनमानस तयार करून इंग्रजांसोबत संघर्ष केला. इंग्रजांना सुद्धा गांधीजींच्या अहिंसात्मक आंदोलनामुळे त्यांच्या कार्याची दखल घ्यावी लागली.

भारत आणि पाकिस्तानची जेव्हा फाळणी झाली. तेव्हा हिंदू आणि मुस्लीम यांच्या मध्ये ज्या दंगली आणि हिंसाचार घडून आला. तेव्हा म.गांधीना अतीव दुखः झाले. त्यांनी प्रत्यक्ष तिथे जाऊन सर्वांना आवाहन केले. हिंसाचार शमविण्यासाठी प्रत्यक्ष दंगलग्रस्त क्षेत्रात जाऊन शांतता प्रस्थापित केली.

आजही त्यांच्या अहिंसा तत्वाची आवश्यकता सर्व जगाला आहे म्हणून त्यांचे विचार आजही तेवढेच महत्वपूर्ण आहेत.

**क) भारताची एकात्मता :**

भारतातील सामाजीक परिस्थिती विचारात घेता. म. गांधीचे विचार आज ही उपयुक्त आहेत. भारतामध्ये विघटनवादी शक्ती कार्यरत आहेत. जातीच्या धर्माच्या व भाषेच्या आघारावर लोकांमध्ये फुटीरतेची भावना बळावत आहे. आपले स्वतंत्र राष्ट्र निर्माण करणाच्या विचारांमध्ये आहेत. परंतु ही गोष्ट बलशाली भारताला धोकादायक आहे. म्हणून भारतामध्ये एकात्मता निर्माण करण्यासाठी म. गांधीचे विचार मोलाचे आहेत. गांधीनी विचारांमध्ये व्यक्तीला केंद्रस्थानी मानून त्याचा विकास करण्याचा उद्देशाने गांधीनी आपले विचार व्यक्त केले आहेत.

भारतातील सामाजिक आणि धार्मिक परिस्थीती विषमतावादी आहे. ही बाब लक्षात घेऊन गांधींजीनी भारतामध्ये आर्थिक स्वयंपूर्णता यावी यासाठी व भारतातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी सह—भोजनाचे आयोजन करून सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्न केला आपल्या चळवळीला मिळणाऱ्या देणगी पैकी ठरावीक रक्कम वार्षिक या कार्यासाठी राखून ठेवलेली होती. त्यांनी जीवनभर भारताच्या एकात्मतेसाठी प्रयत्न केला. परंतु नथ्थूराम गोडसे सारख्या माथेफिरु समाज कंटकाने त्यांचा खून केला. परंतु अशाप्रकारच्या व्यक्तीची हत्या करण्याने विचारांचा कधीही खून होत नाही. उलट ते विचार अधिक जास्त प्रभावीपणे लोकांमध्ये प्रसारित होतात. अशाप्रकारे म. गांधीनी भारताची एकात्मता

जोपासण्याचा जीवनभर प्रयत्न केला. आजही त्यांच्या विचारांच्या आधारावर भारतात मार्गक्रमण करणारे हजारो अनुयायी आहेत. म. गांधी हे केवळ पुस्तकामध्ये किंवा ग्रंथामध्येच नाहीत तर ते जनतेच्या मनामध्ये आणि कृतीमध्ये सुद्धा आहेत. हेच त्यांच्या विचारांची यशस्वीता आहे. गांधीचे विचार आजही राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने तेवढेच महत्त्वपूर्ण आहेत. म्हणून गांधीजी आमच्या मध्ये जिवंत आहेत.

**ड) ग्रामविकास :**

म. गांधीजीनी ग्रामविकास करण्यासाठी विचार व्यक्त केले आहेत. भारतातील लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारावयाची असल्यास लहान लहान उद्योग खेड्यांच्या विकास होणे. आवश्यक आहे. म्हणून अनेक उद्योग खेड्यांमध्ये सुरु करून तसे त्यांना प्रशिक्षण दिले 70% टक्के जनता ही खेड्यांमध्ये राहते. त्याच्या अनेक समस्या आहेत. त्यांचे निराकरण झाल्यास लोकाना आपल्या गावी राहून स्वत: विकास करण्याची संधी प्राप्त होऊ शकते. म्हणून त्यांना स्वयंपूर्ण करण्यासाठी ग्रामीण विकासाच्या योजना राबविण्यात याव्या असे विचार व्यक्त केले. म. गांधीनी सत्ता विकेंद्रीकरणाचे विचार मांडले आहेत.

म. गांधी म्हणतात की, संपूर्ण सत्ता केंद्रित झाल्यास ग्रामीण विकास होऊ शकत नाही म्हणून सत्तेचे विकेंद्रीकरण करून सत्ता ग्रामीण क्षेत्रामध्ये द्यावी. कारण त्यांच्या समस्या त्याना योग्य रीतीने माहित असतात. त्या सोडविण्यासाठी त्याना सत्ता द्यावी. तसेच त्यांनी सुत, कताई, खादी, ग्रामोद्योग सुरु करून ग्रामीण लोकांना आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण बनविण्यासाठी प्रयत्न केले. या कार्याचा दुहेरी उद्देश होता. एक तर इंग्रजांच्या मालाची विक्री कमी व्हावी आणि देशी उद्योगांना चालना मिळावी. या त्यांच्या विचारांचा खरोखर भारताच्या स्वातंत्र प्राप्तीच्या वेळी उपयोग झाला: तसेच आज सुद्धा हे विचार समर्पक आहेत. कारण आज भारतामध्ये आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शहरी भागात श्रीमंती आणि ग्रामीण भागामध्ये कमालीची गरिबी दिसून येते. ही आर्थिक विषमता नष्ट करावयाची असल्यास शेती आणि ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देणे अनिवार्य आहे. म. गांधीनी ग्रामीण क्षेत्राचा विकास म्हणजे भारताचा विकास हे सूत्र त्यांनी दिले म्हणून त्यांचे विचार महत्वपूर्ण आहेत.

**इ) वैश्विक तत्वज्ञान :**

म. गांधीच्या विचारांचा प्रभाव केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये पडलेला दिसून येतो. आईनस्टाईन नेल्सन मंडेला, मार्टिन ल्युथर किंग, अंटनबरो आणि सॅमपित्रोदा या सर्वांबर गांधीच्या विचारांचा प्रभाव पडलेला आहे. अमेरिकेचे सॅम पित्रोदा गांधीच्या साबरमती आश्रमात येऊन त्यांनी २१ व्या शतकातील भारताच्या विकासाच्या ॲक्शन प्लान तयार करून त्याला कृती मध्ये आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. सॅम पित्रोदा अमेरिकेमधून आले. त्याना तिथे सर्व सुख सोई होत्या. परंतु त्यांना म. गांधीजीचे विचार प्रेरणात्मक वाटले. म्हणून त्यांनी भारतात येऊन त्यांच्या विचारांचा अभ्यास करून कृती मध्ये उतरवित आहेत. म्हणून ते विचार समर्पक आहेत.

म. गांधीनी पर्यावरणाविषयी सुद्धा विचार व्यक्त केले आहेत. जागतिकीकरणामुळे औद्योगिकीकरण वाढले. त्यामुळे जल, वायू, प्रदूषण वाढून अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी म. गांधीजीची साधन सूचित महत्वपूर्ण आहे. गांधीजीनी नैसर्गिक संपत्तीचा विनाश करू नये. त्यांचे संगोपन करून त्यांचा उचित उपयोग करावा. असे स्पष्ट केले आहे. अश्या प्रकारे पर्यावरणाचा विचारसुद्धा गांधीजीनी आपल्या तत्वज्ञानामध्ये केलेला आहे.

आधुनिक काळात जागतिक स्तरावर हिंसाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अनेक संहारक शस्त्रांचा शोध लागला आहे. त्यांचा उपयोग दहशदवादी आणि राष्ट्र करीत आहे. भारतात सुद्धा मुंबई हल्ला,इसंसदेवरील हल्ला, अमेरीकेतील पेंटागॉन आणि वर्ल्ड ट्रेंड सेंटर वरील हल्ला या सर्वामध्ये हजारो, लाखो निष्पाप लोकांचे बळी गेलेले आहेत. हे सर्व थांबण्याची शक्ती म. गांधीच्या अहिंसा तत्वामध्ये आहे. हिंसेने कोणतेही प्रश्न सुटत नाहीत, तर ते अहिंसेच्याच मार्गाने सुटू शकतात ही विचारप्रणाली म. गांधीनी या विश्वाला दिली आहे. आणि ते आजही प्रासंगिक आहे.

**मूल्यमापन :**

म. गांधीचे विचार अतिशय महत्वपूर्ण आहेत. गांधीजीनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी आणि विकासासाठी भरीव कार्य केलेले आहे. सत्याग्रह, अहिंसा, विश्वशांती, अस्पृश्यता निवारण, श्रमप्रतिष्ठा आणि स्वराज्य इत्यादी विषयांवर अमुल्य असे विचार प्रगट करून त्यांची अंमलबजावणी केली. त्यामुळे त्यांना विश्वस्तरावर मान्यता मिळाली आहे. अनेक विद्वातानी त्यांच्या कार्याची व विचाराची स्तुती केली आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म. गांधीवर टीका केली. डॉ. आंबेडकर गांधीना महात्मा मानायला तयार नव्हते. कारण गांधीनी कितीही चांगले विचार मांडले असतील. तरीही गांधीजीनी भारतातील अस्पृश्य आणि मागासलेल्या जातींच्या हिताचा विचार न करता त्यांच्या विकासात अडचण निर्माण करून एक प्रकारे उच्चवर्णीयांच्या हिताचे रक्षण केलेले आहे. डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मतदार संघांची व्यवस्था केलेली होती. व त्याद्वारे अस्पृश्यांचे हित जोपासण्याचा प्रयत्न केला होता. तो म. गांधींनी आमरण उपोषण करून रद्द करण्यास भाग पाडले. म्हणून डॉ. आंबेडकरानी अनेक ठिकाणी टीका केली आहे. प्रत्येक विचारवंताच्या काही मर्यादा आहेत. तशाच मर्यादा म.गांधीच्या सुद्धा आहेत. म्हणून त्यांनी केलेले कार्य आणि त्यांचे विचारधन अमुल्य आहे.

**संदर्भः—**

१. लोकराज्य ऑक्टोबर २०१०
२. मुल्कराज आनंद गांधीज फिलॉसोफी ऑफ लाईफ ‘‘एस.सी. विश्वास (संपादित)
३. भा.ल. भोळे, आधुनिक भारतातील राजकीय विचार पिंपळापुरे पब्लिकेशन, नागपूर.
४. वसंत पळसीकर : मराठी अनुवाद स्टडीज एन गांधीक्षम
५. चांगदेव खैरमोडे – डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र खंड

Research Hub International Journal